# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.३११७/२०२२/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. विठोबा लच्छिराम द्यानद्यान, रा.स.नं. १९६, प्लॉट नं. १०५/५, जे.डी. स्टील, श्रमिक नगर, नाशिक, ता.जि. नाशिक | शाखा अभियंता, उपविभागीय अभियंता यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक | उपविभागीय अभियंता, उपविभागीय अभियंता यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक |

**सुनावणी दिनांक – १५/०५/२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | उपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : १०/०६/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : मुदतीत माहिती मिळाली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : शास्ती करण्यात यावी. शिस्तभंगाची कारवाई करावी. नुकसान भरपाई द्यावी.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २१/०२/२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २८/०२/२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : ०४/११/२०२० पासून

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती**

टोकडे, ता.मालेगांव, जि. नाशिक येथे बांधण्यात आलेले व्यापारी गाळे आपल्या विभागाचे मा. सहाय्यक अभियंता यांनी रस्ता मोजमाप पाहणी करुन दिनांक ०४/११/२०२० रोजी सरपंच ग्रामपंचायत टोकडे यांना सदर गाळे सा.बा. विभागाच्या रस्त्यांच्या हद्दीत असल्याने ८ दिवसांत अतिक्रमण काढण्याबाबत नोटीस दिली होती. तद्नंतर आपल्या कार्यालयाच्या मा. कार्यकारी अभियंता यांनी दिनांक ०५/०३/२०२१ च्या वरीष्ठ कार्यालयास सादर केलेल्या खुलाश्यात मा. सहाय्यक अभियंता यांच्या ०४/११/२०२० च्या नोटीसला चुकीचे दाखवत सदर गाळे ग्रामपंचायत हद्दीत असल्याचे नमूद केले आहे. त्याबाबत खालील मुद्दांवर माहिती मिळावी. मुद्दा क्रमांक (१) सहाय्यक अभियंता यांनी दिनांक ०४/११/२०२० रोजी दिलेल्या नोटीस पत्रात गाळे सा.बा. विभागाच्या रस्त्याच्या हद्दीत अतिक्रमण करुन बांधले आहे असा खुलासा केला असताना तद्नंतर मा. कार्यकारी अभियंता यांनी दि.०५/०३/२०२१ सदर गाळे ग्रामपंचायत हद्दीत दाखवताना केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण नस्ती. मुद्दा क्रमांक (२) सदर गाळेपासून आपल्या विभागाच्या रा.म. मार्ग क्र.३ ते खडकी-टोकडे-अस्ताने रस्ता प्ररामा १३१ च्या असलेल्या अंतराचा तपशील. मुद्दा क्रमांक (३) मा. सरपंच ग्रामपंचायेत टोकडे यांनी सदर गाळे आपल्या सा.बां. रस्त्याच्या हद्दीत नसल्याचे दि.२१/१२/२०२० रोजी दिलेल्या पत्राची आपल्या

कार्यालयाने केलेल्या सत्यता पडताळणी कार्यवाहीची संपूर्ण नस्ती. उपरोक्त माहिती आरटीआय लोगोसह नंबरींगसह प्रमाणित करुन मिळावी. सोबत (१) मा. सहाय्यक अभियंता यांनी सरपंच ग्रामपंचायत टोकडे यांना गाळ्यांचे अतिक्रमण ८ दिवसात पाडणे बाबत दिलेली नोटीस. (२) मा. सरपंच यांनी दिलेला खुलासा. (३) मा. कार्यकारी अभियंता यांनी वरीष्ठ कार्यालयास गाळे ग्रामपंचायत हद्दीत असल्याचा खुलासा.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा प्रथम लिपीक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगांव, जि. नाशिक यांनी दि.२८/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थी यांनी सादर केलेला माहिती अर्ज सार्वजनिक बांधकाम, उपविभाग, मालेगांव या कार्यालयाशी संबंधित असल्याने कलम ६ (३) अन्वये हस्तांतरीत करण्यात येत आहे. असे अपीलार्थी यांना कळविण्यात आले आहे.

**४. प्रथम अपील -**

| | | |
|---|---|---|
| (१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक | : | ३०/०३/२०२२ |
| (२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | उपलब्ध नाही. |
| (३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण | : | माहिती मिळाली नाही. |

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, उपविभागीय अभियंता यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

**५. युक्तिवाद/लेखी खुलासा –**

विद्यमान जन माहिती अधिकारी –अपीलार्थी यांचा माहिती अर्ज उपविभागीय कार्यालय यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आला. तथापि सदर अर्ज सार्वजनिक बांधकाम, उपविभाग, मालेगांव या कार्यालयास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तसेच अपीलार्थींचा प्रथम अपील अर्ज देखिल या कार्यालयास प्राप्त झालेला नाही असे आयोगोच्या निदर्शनास आणून दिले.

**६. निष्कर्ष –**

१) माहिती अर्ज व प्रथम अपील अर्ज नोंदणीकृत टपालाने पाठविल्याचे दिसते.
२) संबंधित जन माहिती अधिकारी यांना माहिती अर्ज प्राप्त नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांना प्रथम अपील अर्ज प्राप्त झालेला नाही. मागितलेली माहिती देय ठरत आहे.
३) अपीलार्थी अनुपस्थित असल्याने त्यांनी शास्ती करण्याबाबत, शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत व नुकसान भरपाईबाबत काहीही सिध्द केलेले नाही.
४) सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, उपविभागीय अभियंता यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपीलार्थीस त्यांच्या दिनांक २१/०२/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती / वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपीलार्थी यांना पाठवावे.
२) प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक. ३११७/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ८८४ 04 FEB 2025